# **महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४०००0१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ☎ २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎ 23742191 Fax : 23781061

**ई-मेल sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


### **सहायक मोटार वाहन निरीक्षक (पूर्व) परीक्षा -२०११ क्रमांक १०१९(१)/२०११/तीन**

**जाहिरात क्रमांक : ७३/२०११**

आयोगातर्फे **सहायक मोटार वाहन निरीक्षक (पूर्व) परीक्षा -२०११** ही **रविवार, दिनांक ३ जुलै, २०११** रोजी महाराष्ट्रातील औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे या जिल्हाकेंद्रावर घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदाचे नाव व एकूण पदसंख्या** | **अराखीव** | **अ.जाती व त्यातील बौध्द धर्मातरित** | **अनुसूचित जमाती** | **वि.जा.(अ)** | **भ.ज.(ब)** | **वि.मा.प्र.** | **भ.ज.(क)** | **भ.ज.(ड)** | **इ.मा.व.** |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | **सहायक मोटार वाहन निरीक्षक** (एकूण ११६ पदे) | २७ | ४+११* | १०* | २+७* | २+५* | १+५* | २+८* | -- | १६+१६* |
| | महिला - | ८ | ५ | ३ | ३ | २ | १ | ३ | -- | १० |
| | माजी सैनिक - | ४ | २ | २ | १ | १ | १ | २ | -- | ५ |
| | खेळाडू - | १ | १ | १ | -- | -- | -- | १ | -- | २ |

**२.१** * अशी खुण दर्शविलेली पदे अनुशेषाची आहेत.

**२.२** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.३** महिला, माजी सैनिक व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.४** महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.५** माजी सैनिक उमेदवारांच्या बाबत कार्यमुक्तीचे वैध प्रमाणपत्राची प्रत (Discharge certificate) मुलाखतीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

**२.६** खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३. वेतनश्रेणी :-** ₹९,३०० - ३४,८००, ग्रेड पे ४,३०० अधिक भत्ते.

**४. पात्रतेच्या अटी :-**

**४.१ :- भारतीय नागरीक**

**४.२ वयोमर्यादा :-** दिनांक १ सप्टेंबर, २०११ रोजी किमान १९ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.३** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

**४.३.१** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

**४.३.२** पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत

**४.३.३** माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा, उमेदवाराचा सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षापर्यन्त

**४.३.४** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.४ शैक्षणिक अर्हता :-**

**४.४.१** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस. एस. सी.) किंवा महाराष्ट्र शासनाने एस. एस. सी. च्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता आणि

**४.४.२** राज्य तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेली स्वयंचल अभियांत्रिकी (ऑटोमोबाईल इंजिनिअरींग) मधील पदविका (३ वर्षीय अभ्यासक्रम) **किंवा** यंत्र अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनिअरींग) मधील पदविका (३ वर्षीय अभ्यासक्रम), **किंवा** केंद्र वा राज्य शासनाने या पदविकांशी समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**४.५ अनुभव :-**

**४.५.१** वरील क्रमांक ४.४.२ मधील शैक्षणिक अर्हता संपादन केल्यानंतर, उद्योग संचालनालयाकडे लघु उद्योग म्हणून किंवा इतर कायद्यान्वये लघु उद्योग म्हणून नोंद असलेल्या किंवा ज्यांची वार्षिक उलाढाल रु. ३ ते ५ लाख आहे, अशा मोठया गॅरेज किंवा कार्यशाळेमध्ये हलके वाहन, जड माल वाहतूक वाहन व जड प्रवासी वाहतूक वाहनाच्या दुरुस्तीचे व परिरक्षेचे (मेन्टेनन्स) पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून प्रत्यक्ष काम केल्याचा १ वर्षाचा अनुभव. प्रस्तुत अनुभव हा अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजे **दिनांक १६ जून, २०११** किंवा त्यापूर्वी प्राप्त केलेला असणे आवश्यक आहे.

**४.५.२** आवश्यक अनुभव म्हणून प्रशिक्षणार्थी किंवा शिकाऊ उमेदवार या प्रकारचा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**४.६ अतिरिक्त आवश्यक अर्हता :-**

**४.६.१** सदर परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेस म्हणजेच **दिनांक १६ जून, २०११** रोजी मोटार सायकल, हलके मोटार वाहन, जड माल वाहतूक वाहन आणि जड प्रवासी वाहतूक वाहन चालविण्याची कायमस्वरुपी वैध अनुज्ञप्ती (Licence) उमेदवाराने धारण करणे आवश्यक आहे.

**४.६.२** वर नमूद केल्याप्रमाणे जड मालवाहतूक वाहन किंवा जड प्रवासी वाहतूक वाहन यापैकी एखादेच वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती (Licence) असणा-या उमेदवारास अशी अनुज्ञप्ती, नियुक्तीनंतरच्या परिविक्षा कालावधीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक राहील. परिविक्षा कालावधीमध्ये अशी अनुज्ञप्ती प्राप्त न करणा-या उमेदवारास सेवेतून कमी करण्यात येईल.

४.६.३ वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती (Licence) अखंडीतपणे नुतनीकरण केलेली असली पाहीजे.

४.६.४ उमेदवाराला मराठी लिहीणे, वाचणे, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

**४.७ शारीरिक क्षमता :-**

**४.७.१ पुरूषांकरिता -** उंची १६३ से.मी. (अनवाणी) छाती फुगवून - ८४ से.मी. कमीत कमी प्रसरण - ५ से.मी.

**४.७.२ महिलांकरिता -** उंची १५५ से.मी. (अनवाणी ) वजन ४५ कि. ग्रॅ.

**४.८ दृष्टी :-** चष्म्यासह किंवा चष्म्याशिवाय उत्तम दृष्टीक्षमता असावी. रंगांधळेपणा नसावा.

**५. अपंग आरक्षणाबाबत :-** अपंग उमेदवार पात्र नाहीत.

**६.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** तसेच **" परीक्षा "** या विभागातील **"सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षा"** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**७. शुल्क :**

**७.१** अमागास - ₹२६०/- **७.२** मागासवर्गीय - **₹१३५/-** **७.३** माजी सैनिक - **₹१०/-**

**७.४** सदर शुल्क ऑनलाईन माहितीची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**७.५** बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचुकरित्या केल्याशिवाय माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही. .

**८. अर्ज करण्याची पद्धत :-**

**८.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**८.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ७ जून २०११ ते १६ जून, २०११** या कालावधित सादर करणे आवश्यक राहिल.

**८.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

**८.४** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाइन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.

**८.५** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वत:चा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:ची स्वाक्षरी व फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

**८.६** उमेदवारांनी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डद्वारे प्रवेश (Login) केल्यानंतर Apply Exam / Post या बटणावर क्लिक करावे. त्यानंतर "सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा - २०११" वर Apply केल्यावर उमेदवारास त्याच्या पसंतीचे परीक्षा केंद्र (औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे) निवडावे लागेल. परीक्षा केंद्र निवडल्यानंतर तसेच दिनांक व ठिकाण नमूद केल्यावर Submit to MPSC वर क्लिक करुन आयोगास माहिती सादर करावी.

**८.७** वरीलप्रमाणे आयोगास माहिती सादर केल्यानंतर विहित परीक्षा शुल्काचा भरणा करण्यासाठी Print Challan या बटनावर क्लिक करावे व चलनाची प्रत घ्यावी. सदर चल-नावर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक परीक्षा शुल्क चलनासह भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत रोखपालाकडे सादर करावे व बँकेकडून त्याचवेळी चलनाची प्रत घ्यावी.

**८.८** बँकेमध्ये विहित परीक्षा शुल्काचा चलनाद्वारे भरणा केल्यानंतर चलनावर प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद खालीलप्रमाणे करावी :-

(१) बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डद्वारे प्रवेश (Login) करुन Apply Exam/Post या बटणावर क्लिक करावे व Update Transaction ID या बटणावर क्लिक करुन बँकेकडून प्राप्त झालेला Transaction ID अचूकपणे - नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच उमेदवार परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरेल व पुढील प्रक्रिया करता येईल, अन्यथा पुढील कोणतीही कार्यवाही होऊ शकणार नाही.

(२) Transaction ID ची नोंद अचूकपणे केल्यानंतर व नोंदविलेला Trasaction ID वैध असल्यास उमेदवाराला संबंधित जिल्हाकेंद्रावरील आयोगाने निश्चित केलेले उपकेंद्र निवडावे लागेल.

(३) उमेदवारास त्याच्या प्रवेशप्रमाणपत्राची प्रत प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच, त्याच्या नोंदणीकृत ई-मेल वर प्रवेशपत्र प्राप्त होईल. सदर प्रवेशप्रमाणपत्राची प्रत घ्यावी.

(४) परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

(५) Online पध्दतीने अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी अर्जाची प्रत प्रमाणपत्राच्या प्रती किंवा शपथपत्र आयोगाकडे स्वतंत्रपणे पाठविण्याची आवश्यकता नाही.

**९.** विहित पध्दतीने अर्ज भरुन परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक १६ जून, २०११** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. चलनाद्वारे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक १७ जून, २०११** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.

**१०.** चलनाद्वारे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये भरल्यानंतर प्राप्त होणारा Transaction ID **दिनांक २० जून, २०११ रोजी २३.५९** वाजेपर्यंत अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**११.** आयोगाने विहित केलेल्य पध्दतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या, विहित पद्धतीने व विहित कालावधित न करणाऱ्या उमेदवारांचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**१२.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in व www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

मुंबई :
दिनांक : **२७ मे, २०११**

**दी. प्र.मिरजकर**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महत्वाचे**

| **अ.क्र.** | **जाहिरात** | **ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक** | **परीक्षेचा दिनांक** |
|---|---|---|---|
| १ | राज्यसेवा मुख्य परीक्षा २०११ | ३१ मे,२०११ | १६ जून २०११ ते २ जुलै,२०११ |
| २ | पोलीस उपनिरीक्षक स्पर्धा पूर्व परीक्षा २०११ | ६ जून ,२०११ | २६ जून,२०११ |
| ३ | शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षणसेवा गट अ | - | १७ जुलै,२०११ |

**(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारिरीक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**

**(२) मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.**